माहितीचा अधिकार

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार

तक्रार क्रमांक: ११७/२०२३

तक्रारकर्ता	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	**प्रथम अपीलीय अधिकारी**
श्री. रत्नशील चार्ल्स फुले, प्लॉट नं. ४८, गुरुनानकपुरा,नागपूर-१७	मेडॉडिस्ट चर्च इन इंण्डिया, मेथॉडिस्ट गर्ल्स हॉस्टेल कॅम्पाऊण्ड, मेकोसाबाग, नागपूर	मेडॉडिस्ट चर्च इन इंण्डिया, मेथॉडिस्ट गर्ल्स हॉस्टेल कॅम्पाऊण्ड, मेकोसाबाग, नागपूर

सुनावणी दिनांक १६.१२.२०२४

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. ३०४८/२०२० दिनांक ०५.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १६.१२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, श्री. संदेश चांदेकर, मेडॉडिस्ट चर्च इन इंण्डिया, मेथॉडिस्ट गर्ल्स हॉस्टेल कॅम्पाऊण्ड, मेकोसाबाग, नागपूर उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय (अपील क्र. ३०४८/२०२०) मध्ये दिनांक ०५.०४.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. " अपीलार्थी यांनी मेडॉडिस्ट चर्च इन इण्डिया या खाजगी आस्थापनेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदर संस्थेला शासनाकडून कोणतेही भरीव अनुदान प्राप्त होत नसल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ सदर संस्थेस लागू होत नाही. सबब सदर द्वितीय अपील खारीज करण्यात येत आहे. " असे आदेशीत करण्यात आले होते.

उपरोक्त आयोगाच्या आदेशाचे पुनर्विचार करण्याबाबत तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक ११.०४.२०२३ (प्राप्त दिनांक २६.०४.२०२३) रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "मेकोसाबाग मेथॉडिस्ट हाईस्कुल को सरकार की तरफसे अनुदान मिलता है, इसलिए आपके द्वारा दिये गऐ निर्णय पर पुनर्विचार करने की कृपा करे" अशी आयोगास विनंती केली आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, मा. आयोगाने दिनांक ०५.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या निर्णयात सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. त्यामुळे सदर द्वितीय अपील अर्ज

खारीज करण्यात आले आहे. परंतु तक्रारकर्ता यांनी आयोगापुढे दाखल केलेल्या तक्रार अर्जात आयोगाने पारीत केलेल्या द्वितीय अपील क्र. ३०४८/२०२० मध्ये दिनांक ०५.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे पुनर्विचार करण्याबाबत विनंती केली आहे. तथापि, पुर्नर्विलोकन करण्याचे अधिकार आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

वरील आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

ठिकाण : नागपूर
दिनांक: १६.१२.२०२४

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

जा.क्र.--1021---दि.----------
05 MAR 2025